


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे अंक : २८० वा गुरुवार दि. ०९ जानेवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# फडणवीसांनी ठाकरेंचे पाच शिलेदार फोडले, पण भाजप नेत्याचीच नाराजी...

**वृत्तसंस्था/ पुणे**

शिवसेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पाच माजी नगरसेवकांनी भारतीय जनता पक्षात केलेला प्रवेश स्थानिक कार्यकर्त्यांना न रुचल्याने त्यांनी थेट फ्लेक्सद्वारे आपली नाराजी व्यक्त केली आहे. दुश्मनी जमकर करो लेकिन ये गुंजाइश रहे, जब कभी हम दोस्त हो जाएं तो शर्मिंदा न होंफ, या शेरो शायरीद्वारे मध्य पुण्यातील राजकारणात या पक्षप्रवेशाचे फटाके फुटले आहेत. महापालिकेचे माजी सभागृह नेते आणि भाजपचे नेते गणेश बीडकर यांचे सहकारी विशाल दरेकर यांनी शेरोशायरी असलेले फ्लेक्स शहराच्या मध्यवस्तीत लावले आहेत. पक्षप्रवेशाचा कार्यक्रम मुंबईत पार पडल्यानंतर अवघ्या काही तासांतच हे फ्लेक्स लागले असून, त्याला राजकीय रंग आहे. यावर पक्षप्रवेशाबाबत काहीही लिहिण्यात आले नसले, तरी आपल्या एके काळच्या प्रतिस्पर्ध्यांना त्याद्वारे मेसेज देण्यात आल्याची चर्चा आहे. बीडकर यांच्या निकटवर्तीयांकडून लावण्यात आलेल्या या फ्लेक्समुळे शहर भाजपमधील वरिष्ठ नेत्यांमध्येही आलबेल नसल्याची यामुळे खमंग चर्चा रंगली आहे. उबाठाफ गटातील शिवसेनेच्या पाच माजी नगरसेवकांचा प्रवेश हा भाजपच्या कार्यकर्त्यांना, स्थानिक नेत्यांना फारसा रुचलेला दिसत नाही. सगळ्याच ठिकाणी स्थानिक नेत्यांकडून नाके मुरडण्यात आली आहेत; तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतूनही याबाबत नाराजीचा सूर आळवण्यात आला आहे. विधानसभा स्तरावर उबाठा गटातील आमदारांना केवळ शिंदे गटातच प्रवेश देण्यात आला आहे. हेच सूत्र राष्ट्रवादी काँग्रेसबाबतही आहे. असे असताना पुण्यातील माजी नगरसेवकांचा भाजपमध्ये झालेला प्रवेश आगामी काळातील संघर्षांची



नांदी ठरण्याची चिन्हे आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडेही स्थानिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. दोनच दिवसांपूर्वी हिंदुत्वाचा नारा देत पुण्यातील शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) विशाल धनवडे, बाळा ओसवाल, प्राची आल्हाट, पल्लवी जावळे आणि संगीता ठोसर या पाच माजी नगरसेवकांनी मुंबईत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. भाजपच्या मुंबईत प्रदेश कार्यालयात शिवसेनेच्या या पाच नगरसेवकांचा पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारातून शिवसेनेला खिंडार पाडण्यात यश आले. मोहोळ यांनी गेल्या महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत या नगरसेवकांचा पक्षप्रवेशाचा मार्ग मोकळा केला होता.

## १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांची जयंती शासकीय महापुजा मुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन....

**जनसंचलन/बुलढाणा**

पंढरपुर येथे ज्या प्रमाणे आषाढी एकादशी च्या दिवशी शासकीय स्तरावर श्री. विठ्ठल रुखमीणी यांची मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते महापुजा करण्यात येते त्याच धरतीवर समस्त हिंदु स्थानचे श्रद्धा स्थान असलेल्या छत्रपती शिवरायांच्या मातोश्री राजमाता माँ जिजाऊ मा साहेब यांचे १२ जानेवारी रोजी जयंती उत्सव सोहळा हा मातृतीर्थ सिंदखेड राजा जि. बुलडाणा येथे मोठ्या थाटात साजरा होत असते. मात्र सदर सोहळा हा शासकीय स्तरावर मा. मुख्यमंत्री अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या जबाबदार प्रतिनिधींच्या हस्ते राजमाता जिजाऊ यांची शासकीय पुजा संपन्न व्हावी अशी जिल्हा वासीयांची व




समस्त जिजाऊ भक्तांची भावना आहे. सदर भावना लक्षात घेऊन मा.जिजाऊंची शासकीय महापुजा संपन्न व्हावी या साठी आपण जातीने लक्ष घालावे. व जिजाऊ भक्तांच्या भावनेचा मान ठेवावा

## रानडुकराच्या हल्ल्यात शेतमजूर गंभीर जखमी

**जनसंचलन/मोताळा**

रानडुकराच्या हल्ल्यात कोथळी येथील शेतमजूर हमीद खान समशेर खान (४७) हे गंभीर जखमी झाल्याची घटना कोथळीजवळील पलढग शिवारात मंगळवार ७ जानेवारी रोजी घडली. जखमीवर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तालुक्यातील कोथळी येथील शेतमजूर हमीद खान समशेर खान हे मंगळवार दि. ७ जानेवारीच्या सकाळी आठ वाजताच्या सुमारास कोथळी गावाजवळील पलढग शिवारातील शेतात गहू पिकाला पाणी देत होते. दरम्यान मक्याच्या पिकात दडून बसलेल्या ५ ते ६ रानडुकरांनी अचानक त्यांच्यावर हल्ला करून त्यांना जखमी केले. यावेळी हमीद खान यांनी मदतीसाठी जोरजोरात आरडाओरडा केला असता, परिसरातील शेतकरी व शेतमजुरांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी रानडुकरांना पळवून लावले. या हल्ल्यात हमीद खान यांचा हात व मांडीवर जबर दुखापत झाली आहे. त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी त्यांची विचारपूस केल्याची माहिती आहे. हमीद खान यांच्या कुटुंबाची परिस्थिती हलाखीची आहे. त्यांना शासनाकडून तत्काळ आर्थिक मदत देण्यात यावी, तसेच वनविभागाने वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांमधून होत आहे

# महाराष्ट्रात स्वतंत्र आयुष मंत्रालय निर्माण करावे

## शासकीय कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मच्या-यांना मोफत आयुर्वेद उपचार मिळावा....!

## केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी मांडला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रस्ताव...!

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र आयुष मंत्रालय आणि विद्यापीठ निर्माण करावे तसेच इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातील शासकीय कर्मच्या-यांना आणि सेवानिवृत्त कर्मचा-यांना ॲलोपॅथी सोबतच आयुर्वेदिक उपचारही मोफत मिळावा असा प्रस्ताव केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मांडला आहे.

केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव हे ८ जानेवारीला मुंबई दौ-यावर असतांना त्यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीमध्ये दोन्ही नेत्यांनी विविध विषयांवर चर्चा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये आयुष मंत्रालयाची स्थापना करुन देशात आयुर्वेद उपचार पध्दतीला नविन दालन उपलब्ध करुन दिले आहे. देशातील नागरिकांचे आरोग्य निरोगी राहण्याच्या दृष्टीकोनातुन हर घर आयुर्वेद उपक्रमाअंतर्गत केंद्र सरकारच्या वतीने विविध उपक्रम आणि उपचार पध्दती संदर्भाची माहीती नागरीकांपर्यंत पोहचविण्याचे काम करण्यात येत आहे. आयुर्वेदीक उपचार पध्दतीला देशातील नागरीकांचाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये आयुर्वेदाला प्रोत्साहन देण्यासाठी नविन स्वतंत्र मंत्रालयाची आणि आयुष विद्यापीठाची निर्मीती करण्यात यावी या संदर्भांचा प्रस्ताव त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडला. आयुष मंत्रालयाच्या माध्यमातुन सार्वजनिक आरोग्य, संशोधन, तंत्रज्ञान, शिक्षण, जागतिकीकरण आणि गुणवत्ता वाढीसाठी भरीव काम करण्यात येत आहे. देशाअंतर्गत आयुर्वेद उपचार पध्दतीचा स्विकार नागरीक करु लागले आहे. महाराष्ट्रातील लोकही प्राचीन आयुर्वेद उपचार पध्दतीचा अवलंब करत असल्याने आयुर्वेदाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनातुन स्वतंत्र आयुष मंत्रालय किंवा आयुष विभाग स्थापन करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले. शासकीय कर्मचारी



आणि सेवानिवृत्त कर्मच्या-यांना राज्यस्थान दिल्ली व अन्य राज्यामध्ये मधुमेह, मूळव्याध, त्वचारोग, व इतर आजारांवर ॲलोपॅथीसोबतच आयुर्वेद उपचार मोफत मिळतो. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील शासकीय कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मच्या-यांना मोफत आयुर्वेद उपचार मिळावा असा प्रस्तावही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी मांडला. या प्रस्तावा संदर्भात मुख्यमंत्री आणि केंद्रीय आयुषमंत्री यांच्या विचारविमश होवुन लवकरच योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांना दिले. यावेळी आमदार संजय कुटेही उपस्थित होते.




# राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त जिजाऊ गाथा महोत्सव

## महोत्सवाचा लाभ घ्यावा- जिल्हाधिकारी यांचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

सांस्कृतिक कार्य विभागामार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, व नगरपालिका प्रशासन यांच्या सहकार्याने राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवनिमित्त जिजाऊ गाथा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव श्री. लखुजीराजे जाधव राजवाडा(राजमाता जिजाऊ जन्मस्थळ) परिसर, सिंदखेड राजा येथे दि.१० व ११ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजेपासून सुरु होणार असून विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचा जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. शुक्रवार दि. १० जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी व १०० कलाकारांचा समूहाव्दारे ङ्गजिजाऊ वंदना महाराष्ट्राची लोकधाराफ सांस्कृतिक कार्यक्रम. दि. ११ जानेवारी रोजी महाराष्ट्राचे प्रसिद्ध गायक नंदेश उमप यांचा कार्यक्रम होणार आहे.

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतंर्गत मागेल त्याला सौर कृषी पंप



जनसंचलन/बुलढाणा

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेंतर्गत मागेल त्याला सौर कृषि पंप योजना शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत आहे. या योजनेचा शेतकरी बांधवानी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. योजनेची वैशिष्टे : शेतकऱ्यांना सिंचनासाठी हक्काची स्वतंत्र आणि शाश्वत योजना, सर्वसाधारण गटाच्या शेतकऱ्यांसाठी केवळ १० टक्के रक्कम भरून सौर पॅनेल्स व कृषी पंपाचा पूर्ण संच, अनुसूचित जाती -जमातींच्या शेतकऱ्यांसाठी लाभार्थी हिस्सा ५ टक्के, उर्वरित रक्कम केंद्र आणि राज्य सरकारकडून अनुदान. जमिनीच्या क्षेत्रानुसार ३ ते ७.५ एचपीचे पंप, पाच वर्षांची दुरुस्ती हमी, इन्शुरन्स सह वीजबिल नाही, लोडशेडिंगची चिंता नाही, सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा होईल. लाभार्थी निवडीचे निकष : २.५ एकरापर्यंत शेतजमीन धारक शेतकऱ्यास ३ अश्वशक्ती क्षमते पर्यंतचे सौर कृषीपंप, २.५१ ते ५ एकरापर्यंत शेतजमीन धारक शेतकऱ्यास ५ अश्वशक्ती क्षमतेचा आणि ५ एकरावरील शेतजमीन धारक शेतकऱ्यास ७.५ अश्वशक्ती क्षमतेचा सौर कृषीपंप देय राहील. तसेच पात्र क्षमतेपेक्षा कमी क्षमतेच्या सौर कृषीपंपाचे मागणी केल्यास तो अनुज्ञेय राहील. वैयक्तिक किंवा सामुदायिक शेततळे, विहिर, बोअरवेल यांचे मालक तसेच बारमाही वाहणारी नदी/नाले यांच्या शेजारील शेतजमीनधारक शेतकरी सुद्धा या योजनेसाठी पात्र राहतील. ज्या शेतकऱ्यांकडे बोअरवेल, विहिर व नदी इ. ठिकाणी शाश्वत पाण्याचा स्त्रोत आहे याची खात्री महावितरणद्वारे करण्यात येईल. तथापि, जलसंधारण कामाच्या पाणी जिरविण्याच्या पाणीसाठ्यामधून पाणी उपसण्यासाठी सदर पंप वापरता येणार नाहीत. तसेच अटल सौर कृषी पंप योजना-१, अटल सौर कृषी पंप योजना-२ व मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना या योजनांचा लाभ न घेतलेले लाभार्थी शेतकरी देखील या अभियानांतर्गत लाभास पात्र असतील.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाणा येथे १६ जाने रोजी डिजिटल मिडिया परिषदेची जिल्हास्तरीय बैठक



जनसंचलन/बुलढाणा

मराठी पत्रकार परिषद संलग्नित डिजिटल मीडिया परिषदेची जिल्हास्तरीय बैठक पत्रकार भवन बुलढाणा येथे १६ जानेवारी रोजी दुपारी एक वाजता आयोजित करण्यात आली आहे. बदलत्या काळानुसार प्रिंट मिडियासोबतच डिजिटल मिडियाचे महत्त्व आहे.याची दखल घेत मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख सरांचे मार्गदर्शनात डिजिटल मिडिया परिषदेची शाखा सुरू करण्यात आली. डिजिटल मिडिया परिषदेचे पहिले राज्य अध्यक्ष होण्याचा मान अनिल वाघमारे बीड यांना मिळाला. त्याअनुषंगाने राज्यभर डिजिटल मिडिया परिषदेचे संघटन वेगाने उभे करण्याचे काम त्यांनी हाती घेतले असून प्रारंभी बीड जिल्ह्यासह सांगली,सातारा, पुणे,परभणी,कोल्हापूर व आता बुलढाणा जिल्हास्तरीय कार्यकारिणीची निवड करणार आहेत.डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिलजी वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या बैठकीस जिल्ह्यातील संघटनेचा आढावा घेण्यात येईल तसेच मराठी पत्रकार परिषदेचे नवनियुक्त राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे,बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंह राजपूत व जिल्हा पदाधिकारी यांचा बैठकीत प्रदेशाध्यक्ष अनिलजी वाघमारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. बैठकीत डिजिटल मीडिया परिषदेची जिल्हा कार्यकारिणीचे नव्याने गठन करण्यात येणार आहे.बैठकीत घाटाखाली व घाटावर असे दोन विभाग करून दोन जिल्हाध्यक्षांची नियुक्ती करण्यात येईल तरी जिल्ह्यातील यूट्यूब, पोर्टल व न्यूज चॅनलच्या संपादक व पत्रकारांनी बैठकीस उपस्थित राहावे असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हा प्रभारी तथा राज्य उपाध्यक्ष अनिल उंबरकर यांनी केले आहे.

# सन्मान पत्रकारितेचा:संपादक अन्सार शेख महेश रत्नपुरस्काराने सन्मानित

## मेहकर येथे महेश परिवारातर्फे महेश रत्न पुरस्काराचे वितरण...

जनसंचलन/मेहकर

स्थानिक महेश विद्या मंदिर येथे सोमवार, ६ जानेवारी रोजी बाळ शास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित पत्रकार दिनानिमित्त महेश परिवाराने पत्रकारांचा सत्कार करून त्यांना सदिच्छा भेट दिली. संपादक अन्सार शेख यांना महेश रत्न पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मिनित करण्यात आले. या कार्यक्रमात इतर पत्रकारांचाही सत्कार करण्यात आला व शुभेच्छा भेट देण्यात आल्या. सर्वप्रथम माता सरस्वती महेश यांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात महेश परिवाराचे अध्यक्ष डॉ. सुभाष लोहिया, प्रमुख पाहुणे उदय सोनी, ठोकळ महाराज, यांच्या हस्ते करण्यात आली.रवींद्र वाघ,गणेश राऊत उपस्थित होते.या वेळी मान्यवरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, पत्रकारांनी समाजाप्रती समर्पित जाणीव कशी तरी पत्रकारिता करत असताना संकटांना सामोरे जावे लागते आणि सेवेची भावना जपली पाहिजे. सर्वसामान्यांना ओळख आणि आवाज देण्याचे काम पत्रकार आपल्या लेखणीच्या माध्यमातून करीत असतात. या वेळी या कार्यक्रमास मराठी पत्रकार परिषदेचे मार्गदर्शक तालुकाध्यक्ष दत्ता उमाळे, जिल्हा निसार अन्सारी, सहकार्याध्यक्ष नारायण पचेरवाल,सचिव संतोष सारडा, उपाध्यक्ष मुन्ना काळे, अन्सारोद्दीन शहनाजोद्दीन,अय्युब पठाण कोषाध्यक्ष अविनाश लाड, शहराध्यक्ष सादिक कुरेशी,शेख आलीम,सुनिल मोरे,अशोक शेजूळ,रविंद्र वाघ,सैय्यद हारुण, संतोष जाधव,संतोष सारडा,विशाल फितवे एजाज खान,प्रताप चव्हाण,गजानन दुतोंडे, गजानन सरकटे, उपस्थित होते.



अल्पावधीतच बातमीदारामध्ये ऊच्चांक गाठलेल्या निर्भीड आणि निपक्ष दैनिकाची ओळख असलेल्या दै.विदर्भ जगत चे संपादक अन्सार शेख यांच्या पत्रकारीतेचा गौरव म्हणून मोठ्या थाटामाटात साजरा झालेल्या कार्यक्रमामध्ये महेश रत्न पुरस्काराने सन्मान केल्यामुळे ही खर्या पत्रकारितेची दखल असे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटले आहे.संपादक अन्सार शेख यांना पुरस्कार मिळाल्याने त्यांचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे.

# त्या वसतिगृह अधीक्षकाला १४ दिवसांची पोलिस कोठडी

जनसंचलन/ चिखली

वसतिगृहातील १२ वर्षीय बालकाच्या अजाणतेपणाचा गैरफायदा घेत वसतिगृहाच्या अधीक्षकाने लैंगिक अत्याचार केल्याची घृणास्पद घटना ७ जानेवारीला उघडकीस आली होती. याप्रकरणी बालकाच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून अमडापूर पोलिसांनी तातडीने कारवाई करीत आरोपी विनोद देशमुख यास अटक केली होती. बुधवारी त्यास जिल्हा न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. तालुक्यातील अमडापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या एका गावातील मागासवर्गीय वसतिगृहात असलेल्या एका १२ वर्षीय अल्पवयीन बालकावर वसतिगृहाचा अधीक्षक असलेल्या आरोपी विनोद देशमुख याने अनैसर्गिक लैंगिक अत्याचार केला होता. बालकाने ही बाब त्याच्या आईला सांगितल्यानंतर त्याला काठीने मारहाण देखील केली होती. ३ जानेवारीच्या रात्री हा प्रकार घडला होता. पीडित बालकाच्या आईने अमडापूर पोलिसांत याबाबत फिर्याद दाखल करताच या प्रकरणाची गंभीरतेने दखल घेत पोलिसांनी आरोपीस अटक केली. ८ जानेवारी रोजी त्यास न्यायालयात हजर असता प्रकरणाचे गांभीर्य पाहता पोलिसांनी आरोपीला १४ दिवसांच्या पोलिस कोठडीची मागणी केली. न्यायालयाने ती मान्य करीत तसा आदेशही दिला. या घटनेने सर्वत्र संतापाची लाट उसळलेली असून, आरोपीस कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी होत आहे. प्रशासनाने प्रकरण गंभीरतेने घेतले आहे. पुढील तपास अमडापूर पोलिस करत आहेत

# मराठी पत्रकार परिषद संघाची शहर कार्यकारणी जाहीर....

## शहराध्यक्षपदी राम हिंगे यांची नियुक्ती



जनसंचलन/मलकापूर

बुलढाणा जिल्हा पत्रकारसंघाची आज ८ जानेवारी रोजी पत्रकार भवन या ठिकाणी शहर कार्यकारणी नियुक्त करण्यात आली आहे. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली नव नियुक्त कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे. बुलढाणा शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष म्हणून राम हिंगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर उपाध्यक्ष समाधान चिंचोले, सुनिल मोरे, कार्याध्यक्ष राहुल दर्डा, सचिव इसरार देशमुख, कोषाध्यक्षपदी अजय राजगुरे, सहसचिव रमेश जाधव, सहसचिव ओम कायस्थ, शहर संघटक ईरफान, यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी जिल्हा सरचिटणीस कासिम शेख, कार्याध्यक्ष वसिम शेख, प्रदेश प्रतिनिधी युवराज वाघ, सहसचिव शिवाजी मामलकर, महिला सेलच्या अध्यक्ष मृणाल सावळे, पत्रकार हल्ला कृती समितीचे राजेश डिडोळकर, जितेंद्र कायस्थ, गणेश निकम, बाबासाहेब देशमुख, रहेमत अली शहा, अभिषेक वरपे, प्रकाश जेऊघाले,सोनुने, आदी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होत

# दिल्ली निवडणुकांबाबत उद्धव यांचा गेमचेंजिंग निर्णय...

वृत्तसंस्था/मुंबई

दिल्ली विधानसभा निवडणुकांचं बिगुल वाजलं आहे. आम आदमी पक्ष, काँग्रेस आणि भाजप हे तिन्ही पक्ष दिल्लीत स्वतंत्र लढणार आहेत. इंडिया आघाडीत असूनही काँग्रेस आणि आपने स्वबळावर लढण्याची घोषणा केली आहे. काँग्रेस आणि आपच्या भूमिकेने इंडिया आघाडीतील मित्रपक्षांची मात्र चांगलीच कोंडी झाली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातही दिल्ली कोणाला पाठिंबा द्यावा, यावरुन द्विधा दिसत आहे. एकीकडे ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई यांनी आपला पाठिंबा देण्याचा निर्णय उद्धव ठाकरेंनी घेतल्याचं सांगितलं, तर संजय राऊत यांनी मात्र पाठिंब्याचा निर्णय बाकी असल्याचं म्हटलं आहे. अनिल देसाई यांनी एबीपी न्यूजशी बोलताना सांगितलं, की दिल्लीत उद्धव ठाकरेंनी आम आदमी पक्षाला समर्थन दिलं आहे. कारण लोकसभा आणि विधानसभेच्या वेळी महाराष्ट्रात आपने ठाकरेंना पाठिंबा दिला होता. दिल्लीत काँग्रेस-आप स्वतंत्र लढत असल्यामुळे मतविभाजन हो अनिल देसाई यांनी एबीपी न्यूजशी बोलताना सांगितलं, की दिल्लीत उद्धव ठाकरेंनी आम आदमी पक्षाला समर्थन दिलं आहे. कारण लोकसभा आणि विधानसभेच्या वेळी महाराष्ट्रात आपने ठाकरेंना पाठिंबा दिला होता. दिल्लीत काँग्रेस-आप स्वतंत्र लढत असल्यामुळे मतविभाजन होऊ नये, असं वाटतं. यासाठी दोघांनी समन्वय राखायला हवं, असं मत अनिल देसाईंनी व्यक्त केलं. दुसरीकडे, संजय राऊत यांनी सकाळच्या पत्रकार परिषदेत बोलताना मात्र निर्णय झाला नसल्याचं म्हटलं. काँग्रेस देशात मोठा पक्ष आहे, मात्र दिल्लीत आप मोठा पक्ष आहे. अरविंद केजरीवाल यांची ताकद जास्त आहे. तिथे आप निवडणूक मोठ्या फरकाने जिंकणार असे चित्र आहे. परंतु काँग्रेस-आप इंडिया आघाडीत असूनही वेगवेगळे लढतायत याचं आम्हाला दुःख आहे. निवडणुका एकमेकांच्या विरोधात लढणं



वेगळी गोष्ट, मात्र केजरीवालांवर आरोप नको. एकत्र लढले असते तर आनंद झाला असता. मात्र दिल्लीत कुणाला पाठिंबा द्यायचा, याबाबत आमचा अजून निर्णय झालेला नाही, आम्ही द्विधा मनस्थितीत आहोत. महाराष्ट्रात काँग्रेस आमचा मित्र आहे, पण आपही आमचा साथीदार आहे. दोघंही मित्र आहेत. दोन्ही पक्षांनी प्रचारात बॅलन्स राखावा. उद्धव ठाकरे निर्णय घेतील. पृथ्वीराज चव्हाणही म्हणाले की काँग्रेस-आप एकत्र लढले असते, तर भाजपसमोर अडचणी वाढल्या असत्या. शेवटी आमचा राजकीय शत्रू भाजप आहे, काँग्रेस-आप नाही, असं संजय राऊत म्हणाले.

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणुक रक्कम → / गुंतवणुक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |


आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४–२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००–३१३–२३२४

# वडगाव येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

जनसंचलन/मोताळा

तालुक्यातील शिव मंदिर तीर्थक्षेत्र श्रृंगेश्वर संस्थान वडगाव (खं) येथे मागील ३८ वर्षापासून भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे. यावर्षी रविवार १९ जानेवारीपासून संगीतमय रामायण कथा, अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. कथा वाचन गुरुवर्य महंत स्वामी ब्रम्ह स्वरूपानंद गिरी महाराज करणार आहे. दि. २६ जानेवारी रोजी हभप वासुदेव शास्त्री महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. सप्ताहात सकाळी ५ ते ६ काकडा आरती, ९ ते १२ व दुपारी ३ ते ५ रामायण कथा, सायंकाळी ५ ते ६ हरीपाठ, रात्री ८:३० ते १०:३० किर्तन होणार आहे. १९ जानेवारी रोजी कृष्णा महाराज २० जानेवारी ज्ञानेश्वर महाराज, २१ जानेवारीला मंगेश महाराज, २२ जानेवारी योगीनीताई आळंदीकर, २३ जानेवारी संभाजी महाराज शिरके २४ जानेवारी ज्ञानेश्वर महाराज गावंडे २५ जानेवारी रोजी शिवदास महाराज राहणे (, २६ जानेवारी रोजी रामायण ग्रंथाची शोभायात्रा काढण्यात येणार आहे.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक – जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958